# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे / कालमर्यादा / ईमेलद्वारे**

क्रमांक: संकिर्ण/प्र.क्र. १७०/प्रनिप्रा |९८०

दि. 1 MAR 2019

## "परिपत्रक"

**विषय :** **महाराष्ट्र राज्यातील शासकीय/महानगरपालिका/अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांचे मुळ कागदपत्रे छाननी/तपासणीबाबत....**

**संदर्भ :**
१. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. एमईडी-२०१५/प्र.क्र.३९६/१५/शि-२, दि.१६/१२/२०१५
३. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासननिर्णय क्र. टिईएम-२०१६/प्र.क्र. ५३६/तांशि-४, दि.१५ मार्च, २०१६
४. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे दिनांक ११/०१/२०१८ व २९/०१/२०१९ रोजीच्या बैठकीचे बाब क्र. अनुक्रमे ७ व ७ मधील निर्णय.
५. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे दिनांक ११/०१/२०१९ व २९/०१/२०१९ रोजींचे परिपत्रक.

ज्याअर्थी संदर्भ क्र.२ व ३ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार **शासकीय/महानगरपालिका/अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांचे** प्रवेश अधिनियम, २०१५ च्या तरतुदींनुसार करण्यात आले आहेत, त्याअर्थी शासकीय/महानगरपालिका/अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यता प्रक्रिया प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे बंधनकारक आहे. सदर प्रवेश मान्यतेची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी उक्त महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे ई- छाननी/तपासणी झालेली असल्याचे मे. कल्प टेक्नोलॉजी प्रा. लि. पुणे यांनी स्पष्ट केले आहे. सदर छाननी दरम्यान काही विद्यार्थ्यांच्या कागदपत्राबाबतच्या त्रुटी आढळल्या आहेत. राज्यातील संबंधीत शासकीय/महानगरपालिका/ अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील सदर त्रुटींची पुर्तता करण्यासाठी मे. कल्प टेक्नॉलॉजीस प्रा. लि., पुणे, संबंधीत परिक्षा समन्वयक व संबंधीत संचालकांचे प्रतिनिधी यांनी समन्वयाने, प्राधिकरणाच्या www.safalta.org या ऑनलाईन पोर्टलवर सादर केलेल्या प्रमाणपत्र/कागदपत्रांची तपासणी/छाननी करतील. उक्त संबंधीत महाविद्यालयातील कागदपत्रे छाननी/तपासणी चे कामकाज दि.५/०३/२०१९ ते दि.२०/०३/२०१९ या कालावधीत पुर्ण करावयाचे आहे.

या अनुषंगाने सर्व शासकीय/महानगरपालिका/अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१. सदर प्रकरणी संबंधीत महाविद्यालयांनी प्राधिकरणाचे निरीक्षक व सर्व संबंधीत परिक्षा समन्वयक यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांचे विहित केलेली मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे छाननी/तपासणीकरिता प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कार्यालयात उपलब्ध करुन द्यावेत.

२. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भात त्रुटी आढळल्यास निरिक्षक व महाविद्यालयाने त्या संदर्भात त्रुटींची पूर्तता संबंधीत नोडल अधिकारी तथा संचालनालयामार्फत करण्याबाबत संबंधीत विद्यार्थ्यास लेखी सूचना तात्काळ निर्गमित कराव्यात.

३. सदर छाननी पूर्ण झाल्यानंतर संबंधीत निरिक्षक व सर्व संबंधीत परिक्षा समन्वयक तसेच महाविद्यालय यांनी संयुक्तिक स्वाक्षरीने अहवाल तयार करावा.

४. सदरील छाननी/निरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीत पुढील निर्णयासाठी सादर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सबब शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश तपासणी व मान्यते प्रकरणी विहित केलेल्या प्रक्रियेनुसार कार्यवाही करावी.

(आ. ए. रायते,) भा.प्र.से.
**सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**आयुक्त व सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.**

प्रति,

१ अधिष्ठाता/प्राचार्य,
महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय/महानगरपालिका/अनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

२ सर्व परीक्षा समन्वयक,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

३ मे. कल्प टेक्नॉलॉजीस प्रा. लि., पुणे

प्रति,

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
५. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर

वरीप्रमाणे आवश्यक कार्यवाहीकरिता तथा उक्त निर्देश संचालकांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या विनंतीसह सदर कालावधीमध्ये आपले दोन प्रतिनिधी उपलब्ध करुन दयावेत.

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,-

१. मा. अध्यक्ष/सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक.
२. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.